# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः21.08.2026** **वारःशुक्रवार**

---

1. जपानचे संरक्षण मंत्री शिंजिरो कोइझुमी यांची काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी धोरणात्मक भागीदारीबाबत चर्चा,
2. केंद्रिय मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांच्या दूरसंवाद मंत्र्यांची बैठक आज पुण्यात,
3. जलसंधारण दिनानिमित्त आज महाराष्ट्रात महावॉकेथॉन आणि,
4. BWF जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष आणि महिला दुहेरीच्या सामन्यात आज भारतीय खेळाडूंचे सामने तर एफ आय एच हॉकी विश्वचषकात आज भारतीय महिला संघाचा सामना नेदरलँड्ससोबत.

**<u>जपान</u>**

जपानचे संरक्षण मंत्री शिंजिरो कोइझुमी यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली. या भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदींनी भारत आणि जपान यांच्यातील 'विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारी' अधिक दृढ करण्याबाबतचा आपला दृष्टिकोन मांडला. तसंच इंडो-पॅसिफिक प्रदेशात शांतता, स्थिरता आणि समृद्धी वाढवण्यासाठी भारत-जपान संरक्षण आणि सुरक्षा सहकार्याचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत संयुक्त विकास आणि संयुक्त उत्पादनासाठी, विशेषतः संरक्षण क्षेत्रातील भारतीय कंपन्या आणि स्टार्ट-अप्ससोबत भागीदारी करण्याच्या संधींबद्दल पंतप्रधानांनी माहिती दिली. भारत आणि जपान यांच्यातील संरक्षण क्षेत्रातील सहकार्याला मिळत असलेल्या सातत्यपूर्ण गतीचेही त्यांनी कौतुक केलं.

**<u>मोदी बैठक</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल आपल्या निवासस्थानी केंद्र सरकारच्या सचिवांसोबत तिसऱ्या उच्च-स्तरीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं. पायाभूत सुविधा आणि संपर्क, सुरक्षा, परराष्ट्र व्यवहार तसंच प्रशासन या क्षेत्रांशी संबंधित मंत्रालयं आणि विभागांच्या भविष्यातील कृती आराखड्यावर चर्चा केली. देशाचं भविष्य कसं घडवावं, याविषयी दीर्घकालीन दृष्टिकोनातून विचार करण्याचं आवाहन त्यांनी सचिवांना केलं. माहितीची परस्पर सुसंगतता आणि तिचा प्रभावी वापर वाढवण्यावर भर देत, माहिती ही एक राष्ट्रीय संपत्ती आणि भविष्यासाठीचे एक महत्त्वाचे संसाधन असल्याचं त्यांनी नमूद केलं.

मानवी हस्तक्षेप कायम राखून कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्यावर आणि मानवी नैपुण्यासोबत AI च्या क्षमतांची सांगड घालणारे नाविन्यपूर्ण मार्ग शोधण्यावरही मोदी यांनी भर दिला. गुंतागुंतीच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून भारताचे भविष्य घडवण्यासाठी सर्वसामावेशक दृष्टिकोन, अधिक चांगला समन्वय, नाविन्यपूर्ण विचार आणि सामूहिक जबाबदारीची भावना यांची आवश्यकता असल्याचे सांगून पंतप्रधानांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

**ब्रिक्स बैठक**

केंद्रिय मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज महाराष्ट्रातील पुण्यात ब्रिक्स देशांच्या दूरसंवाद मंत्र्यांची बैठक होत आहे. या परिषदेत सदस्य देशांचे दूरसंवाद मंत्री आणि वरीष्ठ प्रतिनिधी माहिती आणि दूरसंवाद तंत्रज्ञान, डिजिटल रुपांतरण, नवोन्मेष तसंच लवचिक डिजिटल पायाभूत सुविधा याविषयी चर्चा करतील. बदलासाठी अनुकूल भविष्यासाठी माहिती आणि दूरसंवाद तंत्रज्ञान क्षेत्रात नवोन्मेष, सहकार्य आणि हस्तांतरण ही या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. उदयोन्मुख तंत्रज्ञान, डिजिटल पायाभूत सुविधा, भविष्यातील नेटवर्क्स, याबर सुरक्षा, क्षमता उभारणी आणि सर्वसमावेशक डिजिटल कनेक्टीव्हीटी या विषयांवर परिषदेत विचारविनिमय होईल.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर पुण्यात झालेल्या पाच दिवसाच्या चर्चासत्रात डिजिटल सुरक्षा, विश्वास आणि तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. सायबर सुरक्षा, विश्वासार्ह माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञान या विषयीच्या कालच्या परिसंवादात दूरसंचार विभागाचे सचिव अमित अग्रवाल यांनी भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवर भाष्य केलं. आधार आणि युपीआय ही वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून विकसित करण्यात आलेल्या डिजिटल पायाभूत सुविधांची उत्तम उदाहरणं आहेत असं अग्रवाल यावेळी म्हणाले.

**जलसंधारण दिन**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 21 ऑगस्ट 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा केला जातो. या निमित्तानं आज राज्यभरात 'महावॉकेथॉन: वॉक फॉर वॉटर' हे अभियान तसंच विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली आहे.

जलसंधारण ही केवळ शासनाची योजना नाही, तर शासन आणि समाजाच्या सामूहिक सहभागातून यशस्वी होणारी लोकचळवळ असून, जलस्त्रोतांचे संवर्धन आणि पाण्याचा जबाबदारीने वापर करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केलं आहे.

**सर्वोच्च न्यायालय**

नवी दिल्लीत जंतरमंतर इथं झालेल्या विद्यार्थी आंदोलना दरम्यानच्या हिंसाचाराच्या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं एक चौकशी समिती स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आर. सुभाष रेड्डी या समितीचे अध्यक्ष असतील.

**सोमालिया**

सोमालियाच्या पुंटलँड किनारपट्टीजवळ चाचेगिरी करणाऱ्यांनी कॅमेरूनचा ध्वज असलेल्या एका मालवाहू जहाजाचं अपहरण केलं आहे. या जहाजावरील 10 कर्मचाऱ्यांच्या तुकडीत सहा भारतीयांचा समावेश आहे. या जहाजावरून मोगादिशू इथल्या लष्करी प्रशिक्षण केंद्रासाठी तुर्की बनावटीची शस्त्रे, तसंच दळणवळण आणि उपग्रह यंत्रणा नेली जात होती.

**नायजेरिया-बोट दुर्घटना**

नायजेरियातील सोकोतो राज्यात काल एका नदीत बोट उलटल्यानं किमान 47 जणांचा मृत्यू झाला आहे. या बोटीतून 80 हून अधिक लोक प्रवास करत होते. सुरक्षिततेच्या नियमांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे आणि सदोष असलेल्या बोटींचा वापर केल्यानं ही दुर्घटना घडली.

**लडाख**

लडाखमध्ये जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या स्थापनेला केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली. या निर्णयामुळं लडाखच्या दुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांना पात्र असलेल्या कायदेशीर सेवांचा लाभ घेण्यासाठी लागणारा वेळ कमी होईल,असंही अमित शहा यांनी म्हटलं आहे.

**एनटीए**

जेईई मेन, नीट किंवा युजीसी नेट अशा परीक्षांच्या उत्तरतालिकेतील उत्तरांवर आक्षेप घेण्याची एनटीएची प्रणाली सर्व विद्यार्थ्यांसाठी न्याय्य प्रकारे तयार करण्यात आली असून या प्रक्रियेचा खर्च जास्त असल्याबाबतचा दावा राष्ट्रीय परीक्षा यंत्रणा अर्थात एनटीएनं फेटाळून लावला आहे. अनावश्यक आक्षेप घेणं टाळण्यासाठी या प्रक्रियेसाठी शुल्क आकारलं जातं आणि ते आक्षेप योग्य ठरल्यास शुल्क परत केलं जातं, असंही एनटीएनं नमूद केलं आहे.

**प्रल्हाद जोशी-बैठक**

केंद्रिय नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली काल पीएम-कुसुम योजनेच्या पुढच्या टप्प्यासाठीच्या पथदर्शी आराखड्याबाबतची एक बैठक झाली. या बैठकीत योजनेच्या पुढच्या टप्प्यात ऍग्रीव्होल्टेक्सला प्रोत्साहन देण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती त्यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली. पीएम कुसुम योजनेअंतर्गत आतापर्यंत २७ लाख कृषीपंप सौर उर्जेवर रुपांतरित करण्यात आले असून त्यातून 15 गिगावॅटपेक्षा अधिक नवीकरणीय उर्जा निर्मिती झाली आहे. यामुळे दरवर्षी सुमारे 80 लाख 60 हजार लिटर्स इतक्या डिझेलची बचत होत असल्याचंही त्यांनी नमूद केलं आहे. देशात पॉलिसिलिकॉनची निर्मिती करणं आणि वेगवान, सर्वंकष देशांतर्गत सौरउर्जा उत्पादन परिसंस्थेची उभारणी करण्याबाबतच्या उपाययोजनायाविषयी या बैठकीत चर्चा झाली अशी माहितीही त्यांनी दिली.

**साखर पुरवठा**

साखरपुरवठा नियमित ठेवण्याकरता केंद्र सरकारनं साखरेच्या देशांतर्गत साठ्यावर निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार 10 टनांची मासिक उलाढाल करणाऱ्या घाऊक ग्राहकांना आता 15 दिवस पुरेल त्यापेक्षा जास्त साखरेचा साठा करता येणार नाही. येत्या 1 सप्टेंबरपासून 30 नोव्हेंबरपर्यंत हा आदेश लागू राहील. वार्षिक आकडेवारीच्या निकषांवर साखरेचे भाव 18 ऑगस्टपर्यंत 13 टक्क्यानं वाढले आहेत. तसंच येत्या 1 ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या हंगामात साखरेच्या उपलब्धतेबद्दल अनिश्चिचता आहे. त्यादृष्टीनं हा निर्णय घेतला असून तो मिठाई, सॉफ्ट ड्रिंक, अन्नप्रक्रीया उद्योग, आणि इतर मोठ्या ग्राहकांना लागू राहील. सरकारी किंवा निमसरकारी संस्थांना हा निर्णय लागू नसेल. गेल्या महिन्यात सरकारनं दिलेल्या आदेशानुसार कुठल्याही

वितरकाला 30 दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी आवश्यक साठा ठेवता येणार नाही. तसंच जास्तीत जास्त ४ हजार क्विंटल साठवून ठेवता येईल, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

**हॉकी**

एफ आय एच हॉकी विश्वचषकात दुसऱ्या टप्प्यातील पहिल्या सामन्यात आज भारतीय महिला संघ आज नेदरलँड्सशी भिडणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार रात्री साडे नऊ वाजता सुरू होईल. याआधी, काल 'ड' गटातल्या आपल्या अखेरच्या सामन्यात इंग्लंडविरुद्धचा सामना गोलशून्य बरोबरीत सुटल्यामुळं भारतानं दुसऱ्या फेरीत धडक मारली. संपूर्ण सामन्यात भारताची बचावफळी भक्कम राहिली. विशेषतः अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या दुसऱ्या सत्रात भारतानं इंग्लंडचे अनेक पेनल्टी कॉर्नर्स यशस्वीरीत्या रोखून धरलं.

**बॅडमिंटन**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या BWF जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत आज भारतीय खेळाडू पुरुष आणि महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत मैदानात उतरतील. पुरुष दुहेरीत सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी चीनच्या लियांग वेई केंग आणि वांग चांग या तिसऱ्या मानांकित जोडीशी भिडणार आहे.तर, महिला दुहेरीत, भारताची जोडी त्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांचा सामना चीनच्या जिया यी फॅन आणि झांग शू शियान यांच्याशी होईल.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं मध्य प्रदेशमध्ये आज अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. तसंच उत्तराखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातल्या काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज विभागानं वर्तवला आहे. आंध्र प्रदेश, कर्नाटक, राजस्थान, झारखंड, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि अंदमान-निकोबार बेटांवर उद्यापर्यंत विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल,
## नमस्कार.